महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. ११ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक ११९ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१६८९ : औरंगजेबाच्या कैदेमध्ये असलेल्या संभाजीराजांची अतिशय हालहाल करुन हत्या करण्यात आली.

१८८६ : पहिली भारतीय महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांना डॉक्टर ही पदवी मिळाली. भारतातील पहिली महिला डॉक्टर होण्याचा मान मिळवणाऱ्या डॉ.आनंदीबाई जोशी यांना फिलाडेल्फिया विद्यापीठाची एम.डी.ही पदवी बहाल करण्यात आली.

सेन्सेक्स ७८,२०५.९८ +६३९.८२ (०.८२%)

डॉलर ₹ ९१.९६

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४० | १९ |
| दिल्ली | ३५ | २० |
| मुंबई | ३९ | २४ |
| नागपूर | ३७ | २० |
| पुणे | ३८ | १७ |

**सुविचार**

आपल्या आत्म्याची खोली स्वच्छ ठेवा, तेव्हाच आपल्याला जीवनातील खरा आनंद आणि शांती प्राप्त होईल.

सुर्योदय - सुर्यास्त

स.-६:४० संध्या-६:३६

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,६४,७५०/- २,९०,०००/-

**केळी भाव**

नवती : ---- ते ----

पिल बाग : ---- ते ----

कांदे बाग : ----

# संसदेत शेतमालाच्या भावासाठी ‘बटाटा आंदोलन’

## खासदारांचा सरकारविरोधात अनोखा निषेध!

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा या मागणीसाठी समाजवादी पक्षाच्या खासदारांनी मंगळवारी संसदेबाहेर ‘बटाटा आंदोलन’ केले. समाजवादी पक्षाच्या खासदारांनी संसदेच्या आवारात बटाटे आणून निषेध नोंदवला. त्यांनी ‘आलू का उचित मूल्य दिलाओ, किसानों को यूं न सताओ’ (बटाट्याला योग्य भाव द्या, शेतकऱ्यांना त्रास देऊ नका) असे लिहिलेले बॅनर हातात घेऊन सरकारविरोधात घोषणाबाजी केली.**



दरम्यान, आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कृषिन्नती योजना आणि प्रधानमंत्री–धन धान्य कृषी योजनेच्या पुनर्रचनेबाबतच्या प्रश्नांना उत्तरे दिली. निवडणूक आयोगावर ‘मत चोरी’ केल्याचा आरोप करत विरोधी पक्षाच्या खासदारांनी प्रश्नोत्तराच्या तासात सतत घोषणाबाजी केली. त्यामुळे लोकसभेचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

**ओम बिर्लांविरोधात अविश्वास प्रस्ताव**

दरम्यान, सभागृहाचे कामकाज सुरळीत चालल्यास लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्यासाठी विरोधी पक्ष ठराव मांडेल, असे काँग्रेस खासदार के.सुरेश यांनी सांगितले. त्यानंतर बिर्ला यांच्याविरोधात अखेर अविश्वास प्रस्ताव मांडण्यात आला. या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी १० तासांचा वेळ देण्यात आला आहे.

**चर्चेसाठी १० तासांचा वेळ**

अध्यक्षस्थानी असलेल्या भाजपचे खासदार जगदंबिका पाल यांनी सदस्यांना कळवले की, ठरावावरील चर्चेसाठी १० तासांचा वेळ देण्यात आला आहे. त्यांनी खासदारांना आपले भाषण केवळ प्रस्तावाच्या विषयापुरते मर्यादित ठेवण्याचे आणि वेळेचे पालन करण्याचे आवाहन केले.

तसेच, सभापतींनी विरोधकांना ठराव मांडण्याची परवानगी देऊन चर्चेची प्रक्रिया सुलभ करण्यात उदारता दाखवली असल्याचेही पाल यांनी नमूद केले.

### ११८ खासदारांच्या अविश्वास प्रस्तावावर सह्या

सोमवारी (९ मार्च) सभागृहाचे कामकाज वारंवार तहकूब होत असल्याने कनिष्ठ सभागृहात ठराव मांडता आला नाही, असे काँग्रेसचे खासदार के. सुरेश यांनी सांगितले. त्यांनी एएनआयला दिलेल्या माहितीनुसार, जर सभागृह सुरळीत चालले तर आज आम्ही हा प्रस्ताव मांडू. काल सभागृहाचे कामकाजच झाले नाही. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सभागृहात बोलू दिले नाही, असा आरोप करत सभापतींनी पक्षपाती वर्तन केल्याचे सांगत ११८ विरोधी खासदारांनी या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

## थोडक्यात

### दुसरी ते आठवीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**पुणे ।** यंदाही राज्यातील शाळा एप्रिल अखेरपर्यंत सुरू राहणार आहेत. दुसरी ते दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या ‘संकलित मूल्यमापन चाचणी–२’चे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण (एससीईआरटी) परिषदेने जाहीर केले आहे. त्यानुसार ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी अनुक्रमे प्रथम भाषा, तृतीय भाषा या विषयांची परीक्षा घेतली जाणार आहे. शाळांना सकाळ किंवा दुपारच्या सत्रात परीक्षा आयोजित करण्याचे स्वातंत्र्य शाळांना देतानाच वेळापत्रकात बदल करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे आयसीयूमध्ये दाखल

**जयपूर ।** राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांना मंगळवारी जयपूरमधील सवाई मानसिंग (एसएमएस) रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले आहे. नियमित आरोग्य तपासणीसाठी रुग्णालयात गेलेल्या राज्यपालांना अचानक अस्वस्थता जाणवली आणि त्यानंतर त्यांना ताप आल्याने डॉक्टरांनी खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्याचा निर्णय घेतला.एसएमएस रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यपालांच्या उपचारांसाठी आणि त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवण्यासाठी नऊ सदस्यांची डॉक्टरांची समिती स्थापन करण्यात आली आहे. तज्ज्ञ डॉक्टरांची टीम त्यांच्या आरोग्यावर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक वैद्यकीय उपचार देत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लवकरच नोकर भरती

### राज्यात १ लाख १२ हजार रिक्त पदांमुळे कामकाजावर परिणाम

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामधील वर्ग तीन व चार मधील रिक्त पदे लवकरात लवकर भरली जाणार आहेत. रिक्त पदांमुळे पालिकांच्या कामकाजावर परिणाम होऊ नये, यासाठी अधिकाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभाराचे वाटप केले गेले आहे, असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सोमवारी विधानसभेत सांगितले.**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये एक लाख १२ हजार ७६९ रिक्त पदे आहेत. राज्यातील नगरपरिषद, नगरपालिका, नगरपंचायती आणि महानगरपालिकामध्ये पुरेसा कर्मचारी अधिकारी वर्ग नसल्याने कामकाजावर परिणाम होत आहे. त्याचा परिणाम नागरी विकास कामांवर होत आहे, यासंदर्भात सुलभा गायकवाड यांनी लक्षवेधी सूचना मांडली. राज्यातील

(पान २ वर)

# दहा वर्षे पूर्ण झालेल्या बँक संचालकांना ‘निवृत्तीचे नारळ’!

प्रतिनिधी । जळगाव

**राज्यातील जिल्हा सहकारी किंवा नागरी सहकारी बँकांमधील ज्या संचालकांचा कार्यकाळ ऑगस्ट २०२५ मध्ये १० वर्षे किंवा त्याहून अधिक झाला आहे, त्या संचालकांवर आता ‘निवृत्तीचे नारळ’ स्वीकारण्याची वेळ आली आहे. या संदर्भातील कार्यवाही सुरू झाली आहे.**




यासंदर्भात शासनाच्या सहकार–पणन व वस्त्रोद्योग विभागाने राज्याच्या सहकार आयुक्तांना ९ मार्च रोजी एक पत्र पाठविले असून त्यातून वरील बाब स्पष्ट झाली आहे. केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाने गतवर्षी बँकिंग अधिनियमात केलेल्या सुधारणांतील तरतुदींनुसार वर्षानुवर्षे जिल्हा सहकारी किंवा नागरी सहकारी बँकांमध्ये ठाण मांडून बसलेल्या अनेक संचालकांवर या नव्या तरतुदीमुळे गंडांतर येणार आहे.

१० वर्षे पूर्ण झालेल्या बँक संचालकांच्या अपात्रतेसंबंधी मागील काही महिन्यांपासून सहकार क्षेत्रामध्ये चर्चा सुरू होती. अधिनियमातील दुरुस्तीची अंमलबजावणी पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू होते किंवा कसे, याबाबतीत संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर शासनाने फेब्रुवारी महिन्यात रिझर्व बँकेला एक पत्र पाठविले होते. त्या पत्राला उत्तर देताना या बँकेने अधिनियमांतील दुरूस्तीबाबत स्पष्टीकरण दिले आहे.

कोणत्याही सहकारी बँकेच्या संचालकांच्या कार्यकाळास १ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यानंतर १० वर्षे पूर्ण होतील ते या पदावर राहण्यास अपात्र असतील, असे त्यात नमूद करण्यात आले आहे. या दुरुस्तीसंबंधी सहकार खात्याची धारणा वरील प्रमाणेच होती; परंतु त्यावरून काही बँकांच्या संचालकांनी कोर्टकचेऱ्या

(पान २ वर)

## कृत्रिम बुद्धिमत्ता, टेलिमेडिसिनमुळे आरोग्य उपचार अधिक जलद!

वृत्तसंस्था । मुंबई




सध्या तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे आरोग्यसेवा क्षेत्रात मोठे परिवर्तन घडत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), टेलिमेडिसिन, वेअरेबल उपकरणे आणि डिजिटल हेल्थ प्लॅटफॉर्म यांच्या वापरामुळे रुग्णांचे निदान आणि उपचार अधिक प्रभावी होत आहेत. त्यामुळे आरोग्यसेवा केवळ रुग्णालयांपुरती मर्यादित न राहता ती थेट लोकांच्या घरापर्यंत पोहोचू लागली आहे. पूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी रुग्णांना रुग्णालयात प्रत्यक्ष जावे लागायचे. मात्र डिजिटल तंत्रज्ञानामुळे आता मोबाईल ॲप्स आणि व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून डॉक्टरांचा सल्ला घेणे शक्य झाले आहे. यामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाचत असून ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांनाही तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन सहज उपलब्ध होत आहे.

# पुण्यात ‘पाकिस्तान जिंदाबाद’च्या घोषणा देणारा तरुण अटकेत

वृत्तसंस्था । पुणे

**‘पाकिस्तान जिंदाबाद’ अशा घोषणा दिल्यामुळे पुण्यातील झोपडपट्टी परिसरातून एका २० वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली आहे. संबंधित घोषणांचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी अटकेची कारवाई केली. या घटनेनंतर परिसरातील मुस्लीम कुटुंबांनी सोमवारचा इफ्तार रद्द केला. या परिसरातील काही हिंदू कुटुंबांनीही आरोपी तरूणाच्या कुटुंबाला आधार दिला आहे. सदर तरूणाने मस्करीत टिप्पणी केली होती, अशी भूमिका काही जणांनी व्यक्त केली आहे.**

येथील २० वर्षांचा तरूण त्याच्या कुटुंबातील एकटा कमावता व्यक्ती आहे. इलेक्ट्रिशियनचे काम करणाऱ्या या तरूणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यानंतर या तरुणाला अटक करण्यात आली.



**‘तो मुलगा चांगला आहे’, शेजाऱ्यांनी घेतली बाजू**

रविवारी सदर तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम १९२ आणि १९६ (१) नुसार दोन गटात शत्रुत्व निर्माण करण्यास प्रोत्साहन दिल्याबद्दल एफआयआर दाखल करण्यात आला आहे. हिंदू शेजाऱ्यांनी सांगितले की, तो चांगला आहे. एका बांधकाम साईटवर काम करत असताना सहकाऱ्यांशी बोलत असतानाचा त्याचा व्हिडीओ चित्रित करण्यात आला होता. यावेळी आरोपी तरूणाने पाकिस्तान जिंदाबाद म्हटले होते. आरोपीचे कुटुंबिय आणि शेजाऱ्यांनी सांगितले की, तरूणाची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. त्याला त्याच्या मित्राने सदर घोषणा देण्यासाठी उद्युक्त केले आणि त्याचा एडिट केलेला व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केला. त्याने त्याच्या विधानाबद्दल आधीच माफी मागितली आहे.आरोपी तरूणाच्या वडिलांचे दोन वर्षांपूर्वी निधन झाले

(पान २ वर)

हिंदू शेजाऱ्यांनी सांगितले की, सदर आरोपी चांगला मुलगा आहे. तो सकाळी कामाला जातो, सायंकाळी आल्यानंतर घरी आईची मदत करतो. जर त्याची वाईट संगत असती तर आम्हीही त्याला शिक्षा द्यावी, असेच म्हणालो असतो. पण तो चांगला मुलगा आहे. त्याच्याकडून अनवधानाने चूक झाली. आमच्या परिसरात हिंदू आणि मुस्लीम सर्व एकत्रच राहतात.

## नाशिक जिल्ह्याला वणव्यांचा वेढा, चार दिवसांत चार डोंगर खाक



वृत्तसंस्था । नाशिक

जिल्ह्यात तापमानात वाढ होऊ लागताच पुन्हा एकदा वणवे भडकू लागले आहेत. चार दिवसांत जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागात चार ठिकाणी डोंगरांना आग लागली. या आगींमध्ये मोठ्याप्रमाणावर झाडी, झुडपे, गवताची हानी झाली. मखमलाबाद शिवारातील सुळा डोंगराच्या वनक्षेत्रातील वणव्याची तीव्रता इतकी भयानक होती की, दोन मैलावरूनही सुळा डोंगराचा वणवा दिसत होता. वणव्याची माहिती मिळताच दरी– मातोरी भागातील वृक्षमित्र भारत पिंगळे, शिवाजी भाऊ धोंडगे,स्थानिक शेतकरी शेतकरी लक्ष्मन लोखंडे यांनी तब्बल सहा तास कसोटीचे प्रयत्न करून अंधाऱ्या रात्री डोंगर चढून उत्तर पूर्व भागातील सुळा डोंगराचा वणवा विझवला.

# जळगाव जिल्ह्यासाठी ३६ कोटींचे ठिबक अनुदान मंजूर

## राज्यात सर्वाधिक निधी, हजारो शेतकऱ्यांना मिळणार लाभ

प्रतिनिधी । जळगाव

**राज्यात सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाचा वापर वाढवून पाण्याची बचत करत शेती उत्पादनात वाढ करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या ‘प्रतिथेंब अधिक पीक’ योजनेंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी दुसऱ्या टप्प्यातील अनुदानाचे जिल्हानिहाय वाटप केले जात आहे. विशेष म्हणजे योजनेंतर्गत जिल्ह्याला राज्यात सर्वाधिक ३६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.**



राज्यात राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ‘प्रति थेंब अधिक पीक’ योजना २०२५–२६ या वर्षासाठी राबविण्यात येत असून, या योजनेसाठी एकूण ५९६ कोटी रुपयांच्या निधीला यापूर्वीच प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. ठिबक आणि तुषार सिंचन संचांचा वापर वाढविणे, पाण्याचा कार्यक्षम वापर करणे आणि कमी पाण्यात जास्त उत्पादन घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

(पान २ वर)

### ठिबक सिंचनाचे फायदे काय?

सूक्ष्म सिंचनामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते तसेच पिकांना आवश्यक त्या प्रमाणातच पाणी मिळत असल्यामुळे उत्पादनातही वाढ होते. विशेषतः कमी पावसाच्या भागांमध्ये ठिबक आणि तुषार सिंचन पद्धती प्रभावी ठरत आहेत. त्यामुळे राज्य शासन या तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देत असून शेतकऱ्यांना अनुदानाच्या माध्यमातून या प्रणाली बसविण्यासाठी मदत केली जात आहे.

## गॅस तुटवड्यामुळे मुंबईतील ५० टक्के हॉटेल्स बंद होण्याच्या मार्गावर

वृत्तसंस्था । मुंबई

**इराण–इस्त्रायल युद्धामुळे व्यावसायिक गॅसची टंचाई निर्माण झाल्याने त्याचा परिणाम आता हॉटेल व्यवसायावर झाला आहे. व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरचे वितरण थांबल्याने त्यावर अवलंबून असलेल्या हॉटेल्सची कोंडी झाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून गॅस सिलिंडर मिळतनसल्याने मुंबईतील तब्बल २० टक्के हॉटेल्स बंद ठेवण्याची नामुष्की हॉटेल व्यावसायिकांवर ओढावली आहे.**



तर अशीच परिस्थिती आणखी दोन–तीन दिवस राहिल्यास शहरातील ५० टक्के हॉटेल बंद होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. परिणामी खवय्यांसह नागरिकांचे हाल होण्याची चिन्हे आहेत.इराण–इस्त्रायल युद्धाची झळ संपूर्ण जगाला बसत आहे. हवाईसह समुद्री वाहतुकीचा बोजवारा उडाल्यानंतर आता गॅस तुटवडा निर्माण झाला आहे. युद्धाचा गॅसपुरवठा

(पान २ वर)

## संपादकीय

# देशावर इंधनाचे घोंगावतेय संकट

सध्या सुरू असलेल्या युद्धाचा भारतावर विपरीत आर्थिक परिणाम व्हायला सुरुवात झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाचा भाव प्रति बॅरल ११० डॉलरवर गेला आहे. सुमारे आठ दिवसांत हा भाव दुपटीने वाढला आहे. त्यामुळे मोठ्या इंधन दरवाढीचे संकट तर आहेच पण त्याचबरोबर इंधनाच्या उपलब्धतेचेही मोठे संकट देशावर घोंगावत आहे. या युद्धाचे अन्यही आर्थिक दुष्परिणाम दिसू लागले असून शेअर बाजारात तर अक्षरशः हाहाकार उडाल्यासारखी स्थिती आहे. गेल्या सुमारे दहा दिवसांत शेअर बाजार आठ टक्क्यांहून अधिक कोसळला. आज एका दिवसात तो साधारणपणे १८०० ते २००० अंकांनी कोसळल्याच्या स्थितीत होता. या सगळ्या पडझडीत गुंतवणूकदारांचे गेल्या काही दिवसांत जवळपास २० लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. या युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळीसुद्धा कोलमडून पडली असून त्याचेही अन्य दुष्परिणाम भारताला भोगावे लागणार आहेत. सगळ्यात मोठे संकट इंधनाचे आहे. आखाती देशातून होणारा इंधनपुरवठा विस्कळीत झाल्याने त्याचे दर ११० डॉलरच्या पातळीवर गेले असून ते या पुढील काळात आणखी किती वाढणार आहेत याचा अंदाज कोणीही लावू शकत नाही. आता इतक्या मोठ्या दराने तेल विकत घेऊन ते भारतीय ग्राहकांना सध्याच्या भावाच्या पातळीत पुरवणे सरकारला शक्य होणार नसल्याने इंधन दरवाढ अटळ आहे हेही सगळे गृहीत धरून चालले आहेत. कालच घरगुती स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात ६० रुपयांनी वाढ झाली. त्याखेरीज गॅस सिलेंडर उपलब्धतेची मर्यादाही कमी करण्यात आली असून आता महिन्याला फक्त एकच सिलेंडर मिळू शकेल आणि त्याशिवाय एकदा गॅस सिलेंडर बुक केल्यानंतर किमान ३० दिवस पुढचा गॅस सिलेंडर नोंदवता येणार नाही, अशीही नवीन नियमावली लागू करण्यात येत आहे. केंद्र सरकारने सध्या उपलब्ध असलेला गॅस केवळ घरगुती ग्राहकांसाठीच राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला असून उद्योगांसाठी होणारा एलपीजी गॅस पुरवठा अत्यंत मर्यादित किंवा जवळपास बंद करत आणला आहे. आता महागड्या दराने तेल खरेदी करावे लागत आहे अशी सबब सांगून आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या देशातील जनतेला केंद्र सरकारने आणखी अडचणीत आणू नये.

# शहादा येथे विधी सेवा महाशिबीर शासकीय योजनांचा महामेळावा

## नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडविणे हाच शिबिराचा उद्देश : न्यायमूर्ती किशोर संत

प्रतिनिधी । कोलवीमाळ

**जिल्ह्यातील शहादा येथे आयोजित करण्यात आलेल्या विधी सेवा महाशिबीर व शासकीय सेवा व योजनांच्या महामेळाव्याच्या माध्यमातून नागरिक स्वतःच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवतील आणि त्यातूनच या शिबिराचा उद्देश साध्य होईल, असा विश्वास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती किशोर सी. संत यांनी व्यक्त केला.**

शहादा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि शहादा तालुका विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर व शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती किशोर सी. संत आणि न्यायमूर्ती वाय. जी. खोब्रागडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश किशोर पेठकर, पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, जिल्हा परिषदेचे अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, न्यायाधीश योगेश राणे, न्यायाधीश महेश नातू, शहादा तालुका वकिल संघाचे अध्यक्ष स्वर्णसिंग गिरासे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव महेंद्र पाटील, न्यायाधीश प्रशांत कर्वे, न्यायाधीश अजित यादव, न्यायाधीश एस.टी.मालिये, न्यायाधीश यू.एन.पाटील, न्यायाधीश कुणाल नहार, न्यायाधीश एम.सी.नेपते, न्यायाधीश श्रीमती ए.एस.बानखेडे, जिल्हा सरकारी वकील बी.आर.गोसावी यांच्यासह सर्व शासकीय विभागांचे खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना न्यायमूर्ती संत म्हणाले की, नंदुरबार जिल्ह्यातील लाभार्थी विविध शासकीय योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभ घेत असल्याचे त्यांच्याशी साधलेल्या संवादातून दिसून आले. या योजनांमुळे नागरिकांच्या सक्षमीकरणाचा मोठा कार्यक्रम घडत आहे. योजनांचा लाभ घेणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या अधिक असल्याचेही त्यांनी नमूद केले. अनेक योजना तळागाळापर्यंत पोहोचत असल्याने नंदुरबारमधील शासकीय यंत्रणा समर्पणभावाने कार्यरत असल्याची प्रचिती यावरून येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या शिबिरासाठी शहादा येथे योग्य ठिकाणाची निवड केल्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे अभिनंदन केले. सर्वप्रथम आपली ओळख भारतीय नागरिक म्हणून असून प्रत्येकाला न्याय मिळवून देणे हा राज्यघटनेचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सामाजिक व आर्थिक न्याय मिळाल्याशिवाय खरा विकास साध्य होत नाही. विशेषतः दुर्बल घटकांना शासनाच्या योजनांद्वारे आर्थिक सहाय्य मिळणे आवश्यक असून या योजना प्रत्यक्ष लोकांपर्यंत कितपत पोहोचतात हे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. हे शिबिर आयोजित करणे महत्त्वाचे नाही, तर त्यातून लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष किती लाभ घेतला हेच या शिबिराचे खरे यश असल्याचेही त्यांनी नमूद केले. शिबिरातून लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी पुढे इतर गरजूंपर्यंतही या योजनांची माहिती पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी न्यायमूर्ती संत यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील 'माझी माय सरसोती माले शिकवते बोली, लेक बहिणांच्या मनी किती गुपित पेरली' या ओळी उद्धृत करत त्यातील संदेशाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी न्यायमूर्ती वाय. जी. खोब्रागडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा संदर्भ देत सांगितले की, गुलामाला गुलामीची जाणीव करून दिली तर तो बंड करेल. त्याचप्रमाणे गरजू नागरिकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिल्यास ते आपल्या अधिकारांसाठी पुढे येतील आणि शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रशासनापर्यंत पोहोचतील. शासकीय योजना समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचाव्यात यासाठीच या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांना त्यांच्या हक्कांची व अधिकारांची माहिती मिळावी यासाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व मोठे असल्याचे त्यांनी नमूद केले. देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असला तरी खरा विकास तळागाळापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. विशेषतः वंचित घटकांसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## एमआयडीसी पाईपलाईनच्या व्हॉल्वमधून पाणी गळती

प्रतिनिधी । नशिराबाद

येथील छोट्या बोगद्याजवळ, पोलिस स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या एमआयडीसीला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाईपलाईनवरील व्हॉल्वमधून सतत पाणी गळती होत असल्याचे दिसून येत आहे. या गळतीमुळे दररोज हजारो लिटर पाणी वाया जात असून याकडे संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी गळत असल्यामुळे परिसरातील काही नागरिक त्या ठिकाणी येऊन पाणी भरून नेत असल्याचेही दिसून येते. मात्र, नागरिकांनी पाणी भरल्यानंतरही उर्वरित पाणी मोठ्या प्रमाणात वाया जात असल्याने ही गळती थांबवण्यासाठी किंवा त्यावर योग्य प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. उन्हाळ्याच्या तोंडावर पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता असताना अशा प्रकारे हजारो लिटर पाणी दररोज वाया जाणे ही गंभीर बाब मानली जात आहे. त्यामुळे संबंधित विभागाने या ठिकाणची पाहणी करून गळती तातडीने बंद करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पाण्यासाठी लढणाऱ्या हातबारीपाड्याला आशेचा किरण

## युवा क्रांतीचे आंदोलन तात्पुरते मागे

प्रतिनिधी । कोलवीमाळ

**ग्रामपंचायत सावरपाडा अंतर्गत हातबारीपाडा येथे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावर युवा क्रांती संघटनेने दिलेला आंदोलनाचा इशारा तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे.**

हातबारीपाडा या दुर्गम पाड्यावर पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून स्थानिक ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. या संदर्भात युवा क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या समस्येबाबत जि.प. नंदुरबार यांना निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती. प्रशासनाने वेळेत कार्यवाही न केल्यास दि. ११ मार्च रोजी आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला होता. दरम्यान, पं.स.तळोदा येथील संबंधित अधिकारी व सावरपाडा येथील ग्रामविकास अधिकारी यांच्याशी युवा क्रांतीचे प्रदेशाध्यक्ष ॲड. रुपसिंग वसावे व ॲड. दिपक वसावे यांनी भ्रमणध्वनीवरून सविस्तर चर्चा झाली.

# विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांनी सजली अभ्यास जत्रा

प्रतिनिधी । जळगाव

**खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचालित किलबिल बालक मंदिर शाळेमध्ये अभ्यास जत्रा हा अनोखा कार्यक्रम राबविण्यात आला.**



या कार्यक्रमांतर्गत विविध शैक्षणिक साहित्याची माहिती विद्यार्थ्यांनी पालकांना सांगितली. यामध्ये द थर्स्टी क्रो, पुंगी वाल्याची गोष्ट, शेतीची माहिती, यात्रेची माहिती अशा विविध प्रकारचे शालेय शैक्षणिक साहित्य ठेवले गेले होते आणि जवळजवळ शंभर ते दीडशे पालकांसमोर विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक साहित्याची माहिती सांगितली. यामध्ये सीनियर बालवाडी सत्यम, शिवम, सुंदरम् तीनही गटातील विद्यार्थी सहभागी होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून के.सी.ई. सोसायटीचे रेडिओ मनभावन संचालक अमोल देशमुख उपस्थित होते. पाहुण्यांसोबत पालकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले आणि योग्य उत्तरे त्यांना मिळाली पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले. यावेळी मुख्याध्यापिका अर्चना नेमाडे उपस्थित होत्या.

सूत्रसंचालन रत्नप्रभा नेमाडे यांनी केले. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी मदत केली.

# जळगावच्या बालकलावंतांनी विश्व मराठी संमेलनात धरला ताल

## अनुभूती इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थिनींचे सादरीकरण

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे चौथे विश्व मराठी संमेलन नाशिक येथे आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाला जगभरातून १९ देशातील मराठी भाषिक नागरिक सहभागी झाले होते. तीन दिवस चाललेल्या या संमेलनाच्या तिसऱ्या दिवशी बालरंगभूमी परिषदतर्फे अनुभूती इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थिनींनी सहभाग घेत बहारदार कातकरी नृत्य सादर केले.**

अनुभूती इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका रश्मी लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली नृत्य शिक्षक ज्ञानेश्वर सोनवणे यांच्या विद्यार्थिनीं व वादकांनी नाशिकमधील विश्वमराठी संमेलनात जळगावचा झेंडा दिमाखात रोवला. या कलावंतांना बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबईच्या अध्यक्षा ॲड.निलम शिर्के सामंत व प्रभारी प्रमुख कार्यवाह योगेश शुक्ल यांच्या प्रयत्नातून ही संधी मिळाली होती. या मिळालेल्या संधीचे आपल्या जोशपूर्ण नृत्याने या विद्यार्थिनींनी सोने केले. सादरीकरणानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सहभागी विद्यार्थिनी डिंपल चौधरी, भूमिका चौधरी, रेणुका पवार, पूर्वी भावसार, चिन्मयी जंजाळकर, स्वरा महाजन, सुंदरम चिमकर, विद्या सपकाळे, चेतन धनगर, हर्षिता निकुंभ तसेच वादक मोहित सोनवणे, ललित पवार, वेदांत जडे, रोहन चव्हाण, सचिन महाजन यांच्यासह संघप्रमुख ज्ञानेश्वर सोनवणे यांचा प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देवून गौरव करण्यात आला. अनुभूती इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष अतुल जैन व संचालिका निशा अनिल जैन यांनी विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे कौतूक आहे.




## पान १ वरुन

### दहा वर्षे पूर्ण झालेल्या......

सुरू केल्यामुळे सहकार खात्याने बँकेकडून स्पष्टीकरण मागविले होते. ते प्राप्त झाल्यानंतर सहकार विभागाने सहकार आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात वरील तरतुदीची अंमलबजावणी करण्याची सूचना दिली आहे. तथापि सहकार आयुक्तांकडून विभागीय तसेच जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसाठी अद्याप पत्र जारी झालेले नाही. ते पत्र आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल, असे सहकार खात्याच्या संबंधित अधिकाऱ्याने येथे स्पष्ट केले.

### पुण्यात 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या......

होते. त्याचा मोठा भाऊ दिव्यांग आहे. त्यामुळे या तरूणाला शिक्षण अर्धवट सोडून कामावर जावे लागले. बांधकाम साईटवर तो इलेक्ट्रिशियनचे काम करतो. तरूणाची आई घरकाम करते.'व्हिडीओ पाहिल्यावर तुम्हाला लक्षात येईल. माझ्या मुलाला तसे बोलण्यास भाग पाडले आहे. त्याच्या विधाचे काय परिणाम होतील, याचा त्याला अंदाजही नाही. तो अजून लहान आहे, त्याने माफी मागितली आहे'.

### गॅस तुटवड्यामुळे......

साखळीला फटका बसला आहे. देशात गॅसचा तुटवडा वाढत आहे. व्यावसायिक वापराच्या गॅस विक्रीवर निर्बंध आले आहेत. सरकारने गॅसपुरवठा सुरळीत असल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा होत नसल्याचे हॉटेल आणि रेस्टॉरंट संघटनांचे म्हणणे आहे. व्यावसायिक सिलिंडर पुरवठा रोखण्याच्या ५ मार्चच्या सरकारी आदेशाचा हवाला देऊन वितरकांनी सिलिंडर पुरवठा रोखला आहे. सरकारने याबाबत हस्तक्षेप करून स्पष्ट आदेश जारी करण्याची मागणी संघटनांकडून करण्यात येत आहे. ऑनलाइन सिलिंडर आरक्षण होईना – मुंबईत अनेक ग्राहकांना सिलिंडर आरक्षित करण्यात अडचणी येत आहेत. ऑनलाइन सिलिंडर आरक्षण करण्याचा प्रयत्न केल्यास विनंती मान्य केली जात नाही. ङ्गतांत्रिक कारणामुळेतुमची मागणी नोंदवू शकत नाही, असे सांगितले जात आहे. इंधनाचा तुटवडा नसल्याचा संदेश कंपन्यांकडून पाठवला जात आहेत, मात्र सिलिंडरचे आरक्षण होत नसल्याने ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. ५० टक्के हॉटेल्स बंद पडू शकतात – जर गॅस पुरवठ्याची परिस्थिती सुधारली नाही तर येत्या दोन दिवसांत शहरातील ५० टक्के हॉटेल्स बंद पडू शकतात अशी शंका हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशनने (आहार) व्यक्त केली आहे. असोसिएशनने एकत्रितपणे हॉटेल्स बंद करण्याचा कोणताही अधिकृत निर्णय घेतलेला नाही. रेस्टॉरंट्स उघडे ठेवण्याचा किंवा तात्पुरते बंद करण्याचा निर्णय वैयक्तिक हॉटेल मालकांवर आणि त्यांच्या आस्थापनांमध्ये गॅस पुरवठ्याच्या उपलब्धतेवर अवलंबून असणार आहे.

### जळगाव जिल्ह्यासाठी......

या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात केंद्र सरकारने १२१ कोटी रुपये आणि राज्य सरकारने ८० कोटी रुपये असा एकूण २०२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. त्या निधीतून राज्यातील सर्वसाधारण प्रवर्गातील पात्र शेतकऱ्यांना अनुदान वितरित करण्यात आले होते. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात केंद्र शासनाने पुन्हा १७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यापैकी ८५ कोटी ९७ लाख रुपये सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांना देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या रकमेच्या समतुल्य राज्य हिस्सा म्हणून राज्य शासनाने ५७ कोटी ३१ लाख रुपये उपलब्ध करून दिले असून त्यामुळे दुसऱ्या टप्प्यात एकूण १४३ कोटी २८ लाख रुपये शेतकऱ्यांना वितरित करण्यात येणार आहेत. कृषी आयुक्तालयाने हा निधी राज्यभरातील जिल्ह्यांना वितरित करण्याचे आदेश दिले आहेत. अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे हा निधी कृषी आयुक्तालयाच्या लेखा विभागाकडे वर्ग करण्यात आला असून, लेखा विभागाच्या सहायक संचालकांमार्फत तो राज्यातील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.जळगावसारख्या केळी व इतर बागायती पिकांसाठी प्रसिद्ध असलेल्या जिल्ह्यात ठिबक सिंचनाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे ३६ कोटींच्या निधीमुळे आणखी बऱ्याच शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन प्रणाली बसविणे शक्य होणार असल्याचे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये......

नगरपरिषद, नगरपंचायत मध्ये २ हजार ३०८ पदे अ, ब, क श्रेणीतील क व ड आणि सफाई कामगार असे ६ हजार १२७ तर २९ पालिकांमध्ये एक लाख ४ हजार ३३४ पदे रिक्त आहेत. ही नोकरभरती लवकरच केली जाईल, असे मिसाळ यांनी सांगितले.

## गतीमंद महिलेच्या दोन्ही डोळ्यातील मोतीबिंदूवर यशस्वी शस्त्रक्रिया

प्रतिनिधी । जळगाव

लहानपणापासूनच डाउन सिंड्रोम (गतीमंद) असलेल्या एका महिलेच्या दोन्ही डोळ्यांतील मोतीबिंदूवर यशस्वी शस्त्रक्रिया करून तिची दृष्टी पुन्हा पूर्ववत करण्यात डॉक्टरांना यश आले आहे. ही शस्त्रक्रिया जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात करण्यात आली असून नेत्रतज्ज्ञ डॉ. मयूरी निलावाड व त्यांच्या टीमने ही जोखमीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली. नयना वाणी (वय ३८ रा. भुसावळ) ही महिला लहानपणापासूनच डाउन सिंड्रोम या अवस्थेमुळे गतीमंद होती. कुटुंबीयांनी तिला जळगाव येथील डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात नेत्रतपासणीसाठी आणले. डॉ. रेणुका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मयूरी निलावाड यांनी तपासणी केल्यानंतर तिच्या दोन्ही डोळ्यांमध्ये शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली.

# कृषी अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांनी २८ कोटींचे अनुदान लाटल्याचे उघड

## नंदुरबार कृषी विभागातील योजनेतून धनदांडग्यांचे पोषण; चुकीच्या लाभार्थी कंपन्यांची निवड

प्रतिनिधी । नंदुरबार

**नंदुरबारमध्ये चक्क शेतकरी सभासद नसलेल्या कंपन्यांना आणि कृषी अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना २८ कोटींचे अनुदान वाटल्याचा धक्कादायक प्रकार उघड नंदुरबार जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात मोठे फेरफार झाल्याचा आरोप होत आहे.**




शेतकरी उत्पादक कंपन्या या शेतकऱ्यांच्या मालकीच्या समुदाय आधारित संस्था असणे अपेक्षित होते. परंतु, इथे गैरव्यवहार करण्यासाठी एकाच कुटुंबातील संचालक असणाऱ्या वेगवेगळ्या शेतकरी कंपन्यांची निवड करून व त्यांचा शेतीशी संबंध नसलेल्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. या योजनेत निवड झालेल्या २१ शेतकरी कंपन्यांपैकी अनेक शेतकरी कंपन्यामध्ये एकाच कुटुंबातील सदस्य दोन वेगवेगळ्या कंपन्यात संचालक असल्याची धक्कादाक बाब समोर आली आहे.

नंदुरबार कृषी विभागाने जिल्हा नियोजनाच्या जिल्हा धोरणात्मक कार्यक्रमातून राबविलेल्या २८ कोटींच्या योजनेत अनागोंदी उघड झाले असतांना निवड झालेल्या शेतकरी कंपन्यातील संचालक शेतकरीच धनदांडगे असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त सदस्य हे दोन वेगवेगळ्या कंपन्यात संचालक असल्याने या कंपन्यांना मिळालेल्या लाभातून एकाच कुटुंबांचे आर्थिक पोषण झाले आहे. कृषी विभागातच कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचे नातेवाईक संचालक असलेल्या कंपन्याची निवड देखील या योजनेत करुन त्यांना देखील कोट्यवधींचे अनुदान दिल्याने या योजनेतील लाभार्थ्यांच्या निवडीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नंदुरबार जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून जिल्हा धोरणात्मक योजनेंतर्गत जिल्ह्यातील २१ शेतकरी कंपन्याची निवड करुन त्यांना विविध प्रकल्पासाठी २८ कोटींहुन अधिकचे अनुदान मंजूर केले. मात्र, कृषी विभागाने योजनेतील शेतकरी कंपन्याच्या निवडीबाबत अटी, शर्ती तसेच निकष न ठरवल्याने या योजनेत अनेक चुकीच्या लाभार्थी कंपन्यांची निवड झाल्याचे आता समोर येत आहे.

ही योजना राबवितांना निवड झालेल्या संस्था शेतकरी समुदाय आधारीत असणे आवश्यक होते. शेतकऱ्यांना अनुदान देवून त्यांना बळकट करणे, हे ध्येय होते. मात्र, योजनेतील निवड झालेल्या शेतकरी कंपन्यांच्या संचालकांची यादी पाहता धनदांडग्यांना अनुदान दिल्याचे दिसते. यात शेतकरी सभासद असणे गरजेचे होते. मात्र, यातील अनेक शेतकरी कंपन्यांची कार्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या संकेतस्थळावरुन माहिती घेतली असता त्यांना शेतकरी सभासदच नसल्याचे दिसून येत आहे. या योजनेत निवड झालेल्या २१ पैकी सहा शेतकरी उत्पादक कंपन्यांना एकही शेतकरी सभासद नाही. या सहा कंपन्यात फक्त पाच संचालक आणि पाच प्रमोटर अशा १० जणांची संख्या असल्याची माहिती पुढे आली आहे. शेतकरी सभासद नसल्याने हा एक प्रकारे वैयक्तीक कुटुंबाच्या मालकीच्या कंपन्या ठरत आहेत. या योजनेत निवड झालेल्या सुत्तम शेतकरी उत्पादक कंपनीचे भाग भांडवल हे फक्त एक लाख रुपयांचे आहे. त्याला जोडलेल्या शेतकरी सभासदांची संख्या शुन्य आहे. अशातच या कंपनीची निवड करुन तिला ४९ लाखांच्या निधीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यापैकी ३७ लाखांचा निधी सदर कंपनीला वितरीत देखील करण्यात आला आहे. तसेच उषाविला या शेतकरी कंपनीमध्ये देखील एक लाख दहा हजारांचे भाग भांडवल असून याला देखील एकही शेतकरी सभासद जोडलेला नसताना कंपनीला १ कोटी ६५ लाखांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देवून त्यांना देखील १ कोटी २७ लाखांचा निधी वितरीत करण्यात आला आहे. शिवकल्याण शेतकरी उत्पादक कंपनी आणि नवापूर ॲग्रो फार्मर्स प्रोडूसर कंपनी या दोन्ही कंपन्यांमध्ये एकाच कुटुंबातील तीन संचालक सामायिक आहेत. या दोन्ही कंपन्यांना आत्तापर्यंत तीन कोटी ३० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# महापालिकेचे १४५२ कोटींचे मूळ अंदाजपत्रक सादर

## स्थायी समितीच्या सभेत साडेआठ कोटींचे शिलकीचे अंदाजपत्रक : महासभेत मंजुरीसाठी ठेवणार

प्रतिनिधी । जळगाव

**स्थायी समितीच्या सभेत महापालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी मंगळवारी साडेआठ कोटींचे शिलकीचे अंदाजपत्रक सादर केले आहे. १४५२ कोटी रूपयांचे मुळ अंदाजपत्रक सादर करण्यात आले असून त्यावर समिती अभ्यास करणार आहे. त्यानंतर हे अंदाजपत्रक महासभेसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे.**

नवीन नगरसेवक निवडीनंतर महापालिकेची पहिलीच स्थायी समितीची सभा सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी व्यासपीठावर आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, अतिरिक्त आयुक्त शोभा बाविस्कर, उपायुक्त धनश्री शिंदे, उपायुक्त प्रशासन निर्मला पेखळे गायकवाड, नगरसचिव सतीश शुक्ला हे उपस्थित होते. सभेच्या सुरूवातीला आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांच्या हस्ते नवनिर्वाचित सभापती यांचे स्वागत करण्यात आले.

त्यानंतर आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी सन २०२५-२६ चे सुधारीत आणि सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रक सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील यांच्याकडे सादर केले. अंदाजपत्रकातील तरतुदी, जमा-खर्च यासंबंधीच्या



विषयावर आयुक्त ढेरे यांनी सभागृहात निवेदन सादर केले. मालमत्ता करापासून सन २०२५-२६ मध्ये रक्कम रू. ११८ कोटी इतके सुधारित उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे. शहरातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आलेले असून, शहरातील मालमत्तांचे वार्षिक भाडे मूल्य निर्धारणांचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे मनपाचे उत्पन्नात साधारणपणे ५ कोटी रुपयांची वाढ होणार आहे.

या अपेक्षित वाढीसह सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मालमत्ता करापासून १२४ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आलेले आहे. तसेच अतिशय जुनी व जीर्ण झालेली प्रभाग समिती क्र. ३ व ४ चे कार्यालय नुतनीकरणासाठी नवीन ईमारत उभारण्याचे नियोजन केलेले आहे. जळगाव महानगरपालिकेचा गाळेसंदर्भातील प्रस्ताव अन्वये २ व ३ टक्केप्रमाणे आकारणी करण्याबाबत शासनास मंजुरीकरिता पाठविण्यात आलेला आहे. महानगरपालिकेच्या स्वतःच्या उत्पन्नापैकी व्यापारी संकुलातील गाळ्यांपासून

**जळगाव महानगरपालिकेच्या एकूण क्षेत्रफळापैकी ३०% क्षेत्रफळात मलनिसारण योजनेची कामे पूर्ण करण्यात आलेली असून कामांची कार्यान्वित सन २०२४ मध्ये करण्यात आलेली आहे. यापूर्वी महानगरपालिका क्षेत्रात मलनिस्सारण योजना नव्हती. महानगरपालिकेने मलनिस्सारण योजनेचे एकूण पाच पैकी दोनचे काम पूर्ण करून ४८ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचा मल प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित केला असून ऑगस्ट २०२४ पासून यशस्वीरित्या सुरू आहे. सदर कामा अंतर्गत महानगरपालिकेने ४८ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचा मलप्रक्रिया प्रकल्प, २०० किलोमीटर लांबीच्या मलवाहिन्या, मल उपसा केंद्र ही कामे पूर्ण केलेली आहेत.**

मिळणारे उत्पन्न ही प्रमुख बाब आहे. जळगाव शहर महानगरपालिका हद्दीत मनपा मालकीच्या जागेवर एकूण ९२ जागांवर जाहिरात बॅनर, फलक प्रदर्शित करणेकामी स्ट्रक्चर उभारून सदर जागेवर जाहिरात प्रसिद्ध करण्याकरिता अभिकर्त्याची नेमणूक करण्याबाबत निविदा प्रक्रिया राबवण्यात येत आहे. त्यातुन मनपासाठी आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होणार आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने जळगाव शहर महानगरपालिका हद्दीत व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक व्यावसायिकांकडून लायसन्स फी, परवाना फी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार जळगाव शहर महानगरपालिका हद्दीतील व्यवसायिकांना विहित शुल्क आकारून, व्यवसाय परवाना देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. महिला व बालकल्याण या विभागासाठी अंदाज पत्रकात रक्कम रु.२ कोटी ५० लक्ष रुपयांची तरतुद सुचविण्यात आली. महिला व बालकल्याण, दिव्यांग कल्याण या घटकांसाठी आवश्यकतेप्रमाणे मागील वर्षामधील अखर्चीत तरतुद उपलब्ध करुन देण्यास आम्ही कटीबध्द आहोत.जळगाव महानगरपालिकेतर्फे लवकरच शहराकरिता ई-बस सेवा सुरू करण्याचे नियोजन असून त्यासाठी प्राथमिक स्तरावर शहरातील मार्ग निश्चीत करण्याची प्रक्रीया सुरू आहे. या बैठकीला नगरसेवक नितीन लड्ढा, दीपक सूर्यवंशी, नितीन सपके, मानसी भोईटे, कल्पेश सोनवणे, सुरेश सोनवणे, वंदना इंगळे, अरविंद देशमुख, विष्णू भंगाळे, गणेश सोनवणे, सागर सोनवणे, ॲड. दिलीप पोकळे, नरेंद्र पाटील, इब्राहिम पटेल हे सदस्य उपस्थित होते.

## थोडक्यात

### साहित्य सृजन भित्तिपत्रिकेचे विमोचन

**जळगाव ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे इंग्रजी विषयाच्या साहित्य सृजन भित्तिपत्रिकेचे विमोचन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे, योग विभागातील डॉ. लीना चौधरी यांची उपस्थिती होती. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून इंग्रजी विषयाच्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, अमृता प्रितम, तस्लीमा नसरिन, महाश्वेता देवी, मिना कंदासामी यांच्या स्त्रीवादी साहित्यावर व त्यांच्या प्रचलित कोट्स वर प्रकाश टाकणारे भित्तिपत्रिके विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हस्ताक्षराने तयार केले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागातील विद्यार्थीनी कु. सोनल पाटील तर भित्तिपत्रिकांची माहिती व आभार प्रतिभा गलवाडे यांनी मानले.

### नरकातील स्वर्ग पुस्तकाचे २३ मार्च रोजी प्रकाशन

**जळगाव ।** माजी खासदार संजय राऊत लिखित नरकातील स्वर्ग इंग्रजी व हिंदी अनुवादित पुस्तकाचं प्रकाशन सोहळा दि. २३ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता दिल्लीत आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला उद्धव ठाकरे, अरविंद केजरीवाल, कपिल सिब्बल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे,असे जळगाव युवासेनेचे विराज कावडीया आयोजन समितीतर्फे कळविण्यात आले आहे.

# मुळजी जेठा महाविद्यालयातर्फे आव्हाने गावात ऊर्जा साक्षरतेवर जनजागृती




प्रतिनिधी । जळगाव

**केसीई सोसायटी संचालित मू. जे. महाविद्यालयातील भौतिकशास्त्र आणि इलेक्ट्रोनिक्स विभागातर्फे आव्हाना गावात ऊर्जा साक्षरता व ऊर्जा बचत याबाबत जनजागृती करण्यासाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.**

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश गावकऱ्यांमध्ये ऊर्जा वापराबाबत जागरूकता निर्माण करणे व ऊर्जा बचतीचे महत्त्व पटवून देणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात गावात काढण्यात आलेल्या जनजागृती रॅलीने झाली. विद्यार्थ्यांनी ऊर्जा वाचवा- भविष्य वाचवा, अनावश्यक दिवे बंद करा- ऊर्जा बचतीचा संकल्प करा, सूर्य, वारा, आणि पाणी- स्वच्छ ऊर्जेच्या खाणी, ऊर्जा वाचवा- उज्वल भविष्यासाठी पाऊल टाका, सौर ऊर्जेचा प्रकाश- पर्यावरणाचा विकास, पवन ऊर्जेचा वेग- प्रदूषणाला ब्रेक, इत्यादी अशा घोषणांनी गावातील प्रमुख रस्त्यांवरून रॅली काढली. या रॅलीदरम्यान पोस्टर आणि फलकांच्या माध्यमातून ऊर्जा संवर्धनाचा संदेश गावकऱ्यांमध्ये पोहोचविण्यात आला. रॅलीनंतर विद्यार्थ्यांनी गावाच्या चौकात चौकात ऊर्जा बचतीवर आधारित पथनाट्य सादर केले. या पथनाट्यात विजेचा अपव्यय, अनावश्यक दिवे-पंखे चालू ठेवणे, दैनंदिन जीवनात ऊर्जेचा आवश्यकतेपेक्षा जास्त होणारा वापर, गैरनवीकरणीय आणि नवीकरणीय उर्जा म्हणजे काय व त्याचा उत्तम वापर कसा करावा, यासारख्या उपायांचा संदेश दिला. पथनाट्याच्या माध्यमातून लोकांना सोप्या व प्रभावी पद्धतीने ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगितले. प्रा.सोनाली शर्मा, डॉ. प्रतिभा निकम यांचे मार्गदर्शन लाभले. गावाचे सरपंच भगवान पाटील, कैलाश चौधरी तसेच गावकरी यांचे सहकार्य लाभले.

# देवाभाऊ फाऊंडेशन जळगाव सहसमन्वयकपदी प्रल्हाद सोनवणे

प्रतिनिधी । जळगाव

**देवाभाऊ फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या जळगाव लोकसभा सहसमन्वयकपदी कोळी समाजाचे कार्यकर्ते तथा ऑटो रिक्षा चालकांचे अध्यक्ष प्रल्हाद सोनवणे यांची नियुक्ती गजाननराव जोशी यांनी केली.**



प्रल्हाद सोनवणे हे आदिवासी कोळी महासंघ, ऑटो रिक्षा चालक मालक संघटना संयुक्त कृती समिती, नेताजी सुभाषचंद्र बोस रिक्षा युनियन, जळगाव जिल्हा भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा, कर्तव्यदक्ष पोलिस मित्र फाऊंडेशन यांच्या माध्यमातून सामाजिक कार्य करीत आहेत.

या कार्याची दखल घेऊन त्यांना देवाभाऊ फाऊंडेशन महाराष्ट्र प्रदेश या संघटनेत जळगाव लोकसभा सहसमन्वयक पदांची जबाबदारी दिली आहे.

मुख्य समन्वयक गजाननराव जोशी, प्रदेश सहसमन्वयक, डॉ आशुतोष घोलप (संघटन) सहसमन्वयक प्रवीण अलाई, सहसमन्वयक श्रीकांत थिटे, विवेक देशकर, सहसमन्वयक, वृंदाताई लाड, ॲड. मंदार जोशी यांच्या मार्गदर्शनाने प्रल्हाद सोनवणे हे जळगाव विभागातून कार्य करणार आहेत. त्यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पीएसआय वाल्मीक वाघ अखेर पोलिसांना शरण : गुन्ह्यात मुलालाही केली अटक

प्रतिनिधी । जळगाव



**पोलिसांच्या दक्षता पेट्रोल पंपावरील इंधन विक्रीतून आलेल्या १.३३ कोटी रुपयांचा अपहार करणारा पोलिस उपनिरीक्षक वाल्मीक वाघ अखेर पोलिसांना शरण आला. त्याच्या मुलाच्या बँक खात्याचाही सहभाग समोर आल्याने त्यालाही ताब्यात घेऊन दोघांना अटक केली आहे.**

पोलिस दलाच्या दक्षता पेट्रोल पंपाच्या दैनंदिन व्यवहारांची जबाबदारी वाल्मीक वाघ याच्याकडे व्यवस्थापक म्हणून होती. त्यांनी १ कोटी ३३ लाख ७५२ रुपयांचा अपहार केल्याबाबत फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. वाघ पसार असल्याने त्याच्या शोधार्थ पथके रवाना केली होती. ९ मार्च रोजी तो स्वतः स्थानिक गुन्हे शाखेच्या कार्यालयात हजर झाला. पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, तपासाधिकारी राहुल गायकवाड यांनी त्याची चौकशी केली. चौकशीत वाघ केवळ १० ते १५ लाखांचा अपहार केल्याचे सांगत आहे. वाल्मीक वाघ याला ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी त्याच्या बँक खात्याची चौकशी केली. त्यात अपहार काळात मोठ्या प्रमाणात रक्कम ट्रान्सफर झाल्याची शक्यता वर्तवली आहे.

### प्रथमेश भालेराव यांचे सी.ए. परीक्षेत यश

प्रतिनिधी । जळगाव

नुकत्याच झालेल्या सी.ए परीक्षेत प्रथमेश प्रफुल्ल भालेराव याने उज्वल यश संपादन केले. ही भारतातील एक व्यावसायिक आणि प्रतिष्ठित पात्रता परीक्षा आहे, जे आर्थिक लेखाकर्म, लेखापरीक्षण, कर, वित्तीय नियोजन, आणि व्यवसाय सल्ला यांसारख्या क्षेत्रात किंवा नोकरी दोन्हीसाठी केली जाते. वयाच्या फक्त २३ व्या वर्षी मिळालेल्या या यशामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्राणायामाने व्यक्ती कुठलाही मोठा धक्का पचवू शकतो: डॉ.चौधरी

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत मध्यान, योगा आणि महिलांचे आरोग्य या विषयावर योगा विभागातील डॉ. लिना चौधरी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमप्रसंगी प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.**

यावेळी बोलताना डॉ. लीना चौधरी यांनी पतंजली मुनींच्या विविध श्लोकांचा आधार घेऊन सूर्यनमस्कार, ध्यान-धारणा, योग व योगातील यम-नियम यांचे महत्त्व विशद केले. ध्यानाने व प्राणायामाने व्यक्ती कुठलाही मोठा धक्का पचवू शकतो कारण योग नियमांनी मनाचे नियंत्रण चांगले करता येते. सोबतच शरीरामध्ये व मनामध्ये सकारात्मक बदल घडून आणण्यासाठी सूर्य नमस्काराचेही अनेक फायदे आहेत. त्यासाठी प्राणायाम सगळ्यात जास्त उपयोगी ठरतात, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रा. म.सु. पगारे यांनी योगाचे अतिसाधारण महत्व विशद करत सुखाची संकल्पना ही आरामात नसून ती बेशुद्ध अवस्था व आळस दूर करून काम करण्यात व कामात व्यस्त राहण्यात आहे. ध्यान म्हणजे फक्त डोळे मिटून बसणे नव्हे तर, स्वतःशी बोलणे आहे. मनुष्य हा सुसंवादी असणे गरजेचे असते. योगामुळे स्थिरता प्राप्त होण्यास मदत होते व प्राणायामामुळे शरीर व मन दोघांची शुद्धी होते. या कार्यक्रमाप्रसंगी प्रशाळेतील प्राध्यापक डॉ. दीपक खरात, डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. प्रीती सोनी, प्रतिभा गलवाडे, कृष्णा संदानशिव, खेमराज पाटील, प्रीती मनुचारी, नेहा लाम्हणे यांनी चर्चेत सहभाग घेऊन आरोग्यविषयक प्रश्न विचारून चर्चा केली. या कार्यक्रमसाठी महेश सूर्यवंशी, पल्लवी बारी, सुकन्या जाधव हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन इंग्रजी विभागातील प्रतिभा गलवाडे यांनी केले.

# ध्येय निश्चित करून स्वत: रोल मॉडेल व्हा : प्रा.अशोक गिरी

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेतील अद्ययावत सभागृहाचे उदघाटन व रिसर्च, पेटंट पब्लीकेशन वार्ड व स्वयंम कोर्सेसमधील सर्वोत्कृष्ट ठरलेल्या विद्यार्थ्यांना पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे मुख्य शास्त्रज्ञ प्रा. अशोक गिरी व कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते देण्यात आले.**




यावेळी मंचावर पुणे येथील रासायनिक प्रयोगशाळेचे शास्त्रज्ञ प्रा. रामरूप सरकार, सेवा निवृत्त मुख्य शास्त्रज्ञ प्रा.एम.व्ही. बडीगर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.जे.व्ही. साळी व जैवशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. भूषण चौधरी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस जैवशास्त्र प्रशाळेतील अद्ययावत सभागृहाचे उद्घाटन प्रा. अशोक गिरी यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटकीय भाषण करतांना प्रा. अशोक गिरी यांनी संशोधक विद्यार्थ्यांना सांगितले की, इंग्रजी भाषेचा न्यूनगंड ठेवू नका, तुम्ही जरी मराठी माध्यमातून शिकला असाल तरी तुमची संकल्पना संशोधनात महत्वाची ठरते. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यापीठाने संशोधनासाठी सुरु केलेल्या योजनांचा लाभ घ्यावा असे सांगून ध्येय निश्चित करून स्वत: रोल मॉडेल व्हा अशा पध्दतीने जीवनात यशस्वी व्हा, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक प्रा. भूषण चौधरी यांनी तर स्वयंम कोर्सेसची माहिती जयदीप साळी यांनी दिली.

यावेळी कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजने अंतर्गत रिसर्च पब्लीकेशन वार्ड - २०२५ मिळालेल्या विद्यापीठीय रसायन तंत्रज्ञान संस्थेतील एकनाथ कोले, धनंजय पगारे, जगदीश वानखेडे, रसायन शास्त्र प्रशाळेतील प्रतिक वाघ, गणितशास्त्र प्रशाळेतील ललिता नेरकर, पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेतील प्रज्ञा केदार व योगिता पाटील यांना प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देण्यात आले. पेटंट पब्लीकेशन वार्ड - २०२५ जगदीश वानखेडे या संशोधक विद्यार्थ्यास देण्यात आला.

**या कार्यक्रमात स्वयंम कोर्सेसमध्ये राष्ट्रीय पातळीवर सर्वोच्च १% यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांमधील जैवशास्त्र प्रशाळेतील इशा पटेल व सर्वोच्च ५% यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांमधील भौतिकशास्त्र प्रशाळेतील रोहन बोरसे यांना प्रमाणपत्र देवून गौरवांकित करण्यात आले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून राष्ट्रीय विज्ञान दिवस व इतर स्पर्धांमधून जैवशास्त्र प्रशाळा व भौतिकशास्त्र प्रशाळेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके मंचावर वरील मान्यवरांच्या हस्ते देण्यात आलीत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सहायक कुलसचिव प्रवीण चंदनकर यांनी केले तर जैवशास्त्र प्रशाळेच्या पुरस्कारांची घोषणा प्रा. प्रवीण पुराणिक व भौतिकशास्त्र प्रशाळेच्या पुरस्कारांची घोषणा प्रा. गौरी घोष यांनी केले.**

# ई-चलनच्या सुविधांबद्दल उपाय योजना करा

## प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना वीर सावरकर रिक्षा युनियनचे साकडे

प्रतिनिधी । जळगाव

**वीर सावरकर रिक्षा युनियनचे जिल्हाध्यक्ष दिलीप सपकाळे यांच्या नेतृत्वात जळगाव जिल्ह्यातील ई- चलन संदर्भातील अडचणी, पार्किंगच्या संदर्भातील मूलभूत व पायाभूत सुविधांबद्दल उपाय योजना तसेच वाहन तपासणीच्या नावाने वाहनधारकाची होणारी लूट थांबवण्यात यावी, या मागण्यासाठी जिल्हाधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी तसेच पोलीस अधीक्षक जळगाव यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले.**



भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ५१९ अंतर्गत, भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ५१४ अंतर्गत ज्या केस भरण्यासाठी वैधानिक मर्यादा कालावधी शिक्षा फक्त दंड आहे, त्या घटनेच्या तारखेपासून ६ (सहा) महिने आहे. अशी सर्व प्रकारची कालबाह्य चलने सरसकट रद्द करण्यात यावीत. पोलीस तथा पोलीस कर्मचारी, अधिकारी यांच्याकडून मोबाईलद्वारे फोटो काढून पोर्टलवर डाऊनलोड करून गुन्हा दाखल केलेली चलने, चालकाचा छायाचित्रातून गुन्हा सिद्ध होत नसताना चुकीचे पुरावे देऊन गुन्हा दाखल केलेली चलने, गुन्हा दाखल केलेल्या चलनावर चालकाचे लायसन्स नंबर नसलेली चलने, दंड भरूनही पोर्टलवर प्रलंबित दाखवणारी चलने आदी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना देण्यात आली. यावेळी वाल्मिक सपकाळे, संजय अडकमोल, रमेश सोनार, भास्कर ठाकरे, सुरज पाटील,शांताराम पाटील, बाळू पाटील, किरण पाटील, संजय चौधरी, दिनकर ठाकरे, नितेश पाटील,रवींद्र कोळी, सागर सोनवणे आदी उपस्थित होते.

# शाळकरी मुले हेच खऱ्या अर्थाने देशाचे भवितव्य असेल

## संतुलित आहार निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली : सीईओ करणवाल



प्रतिनिधी । जळगाव

**शाळकरी मुले हेच खऱ्या अर्थाने देशाचे भवितव्य असून त्यांचे भवितव्य निरोगी आणि सक्षम बनवायचे असेल तर लहानपणापासूनच त्यांना संतुलित आहार आणि पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी केले.**

जिल्हा परिषद जळगावच्या शाहू महाराज सभागृहात जिल्हा परिषद शिक्षण विभाग व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संतुलित आहार निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली व पर्यावरण या विषयावरील पुस्तिका प्रकाशन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधरी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य अनिल झोपे, प्रा.चंद्रकांत साळुंखे, शिक्षण अधिकारी निलेश पाटील तसेच इतर अधिकारी व शिक्षक उपस्थित होते.

या कार्यक्रमात जिल्ह्यातील शिक्षकांच्या समूहाने तयार केलेल्या संतुलित आहार व पर्यावरण विषयक पुस्तिका तसेच बंजारा भाषेवरील पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल म्हणाल्या की, सध्या विद्यार्थ्यांमध्ये जंक फूडचे सेवन मोठ्या प्रमाणात वाढले आहे.त्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती होणे गरजेचे आहे. तसेच पर्यावरणाबाबत संवेदनशीलता निर्माण व्हावी आणि समाजामध्ये व्यापक जनजागृती व्हावी, या उद्देशाने या पुस्तिकांची निर्मिती करण्यात आली आहे. या पुस्तिकांच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांमध्ये आरोग्य व पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होईल. त्या पुढे म्हणाल्या की, अधिकारी बदली होऊन गेले तरी अशा प्रकारच्या पुस्तिकांच्या माध्यमातून हा उपक्रम दीर्घकाळ जिल्ह्यात सुरू राहू शकतो. त्यामुळे शिक्षकांनी या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून हा उपक्रम जिल्हाभर प्रभावीपणे राबवावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य अनिल झोपे यांनी या उपक्रमामागील उद्देश आणि पुस्तिका निर्मितीची पार्श्वभूमी विषद केली. यावेळी पुस्तक निर्मितीत योगदान देणाऱ्या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी भाजप कार्यालयात साजरी



प्रतिनिधी । जळगाव

**स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी आज दि.१० मार्च रोजी भाजप कार्यालय (जीएम फाउंडेशन) येथे सकाळी १० वाजता भाजपा जिल्हा महानगर अध्यक्ष दीपक सूर्यवंशी , महापौर दीपमाला काळे , माजी महापौर सीमा भोळे , प्रदेश सदस्य संतोष इंगळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले .**

याप्रसंगी जिल्हा पदाधिकारी उदय भालेराव , दीपक परदेशी, अरविंद देशमुख, महेश चौधरी, ललित बडगुजर, सचिन बाविस्कर, विजय वानखेडे, प्रकाश पंडित, पंकज जैन, आशिष सपकाळे, सुरेश सोनवणे, किरण भोई ,दिलीप लाडवंजारी, रेखा वर्मा, वंदना इंगळे, भाग्यश्री चौधरी, माधुरी हांडे, रोहित सोनवणे, मंडलाध्यक्ष आनंद सपकाळे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंकज माध्यमिक विद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

प्रतिनिधी । चोपडा

येथील पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा स्मृतिदिन श्रद्धेने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.



यावेळी शिक्षक आपले मनोगत व्यक्त करताना बी.एम. तायडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही धैर्याने मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला, असे सांगितले. त्यांच्या कार्यामुळे समाजात स्त्रीशिक्षणाचा मार्ग मोकळा झाला, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला वैशाली पाटील, अविनाश पाटील, दीपक सोनवणे , जयेश मंडपे व मोनाली देसाई यासह सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

उपस्थितांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करण्याचा संकल्प केला.

## थोडक्यात

### बालाजी विद्यालयात महिला दिन साजरा

**पारोळा ।** येथील श्री बालाजी विद्याप्रबोधनी मंडळ संचलित पूर्व प्राथमिक-प्राथमिक विद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त वेशभूषा, रांगोळी, मेहंदी, वकृत्व, निबंध स्पर्धा घेऊन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष यू.एच. करोडपती तर प्रमुख पाहुणे संचालिका मंगला करोडपती सचिव डॉ. सचिन बडगुजर, विद्यालयाचे मुख्याध्यापक हेमंतकुमार पाटील प्राचार्या स्वाती बलखंडे, सदस्य राधिका बडगुजर, विद्यालयातील महिला शिक्षिका आदी उपस्थित होते. व्यासपीठावरील मान्यवरांनी प्रतिमा पूजन केले. तसेच सर्व महिला शिक्षिका व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

# चोपडा ज्येष्ठ नागरिक संघाचा ‘अतिउत्कृष्ट संघ’ म्हणून गौरव

प्रतिनिधी । चोपडा

**येथील ज्येष्ठ नागरिक संघाचा ग्रामीण क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल राज्यस्तर ‘अतिउत्कृष्ट संघ’ म्हणून गौरविण्यात आले आहे.**

महाराष्ट्र राज्याचे ‘३५ वे अधिवेशन फेस्काम, नाशिक येथे संपन्न झाले. त्यात चोपडा ज्येष्ठ नागरिक संघाला ग्रामीण व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राज्यस्तर ‘अतिउत्कृष्ट संघ’ म्हणून दोन पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते दोन स्मृतिचिन्ह व दोन प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.



यानिमित्ताने संघाचे अध्यक्ष जयदेव देशमुख, माजी अध्यक्ष विजय करोडपती, प्रमोद डोंगरे, जिल्हा संघटक, उपाध्यक्ष जिजाबराव नेरपगारे , अनिलकुमार पालीवाल, प्रा.एल.एम, पाटील, अरुण पाटील आदी उपस्थित होते. यानिमित्त त्यांचे मंगेश भोईटे (मुख्याध्यापक-कै हि.मो. करोडपती माध्यमिक विद्यालय),प्रा.एस.बी.महाजन यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# बोली भाषांमुळे मराठी भाषा प्रगल्भ झाली

## ज्येष्ठ अहिराणी साहित्यिक कृष्णा पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**बोली भाषांमुळे मराठी भाषा प्रगल्भ झाली आहे. साहित्यिकांमुळे खान्देशातील अहिराणी भाषा ही गल्लीपासून ते जागतिक स्तरापर्यंत पोहोचली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक अहिराणी साहित्यिक कृष्णा पाटील यांनी केले आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व विद्यार्थी विकास विभाग आयोजित चौथे बहिणाबाई विद्यार्थी साहित्य संमेलन कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.**



यावेळी मंचावर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. एस. टी इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य व संमेलनाचे स्वागताध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, व्य.प. सदस्य व कार्याध्यक्ष नितीन झाल्टे, बोली भाषा अभ्यासक डॉ. अशोक कोळी, अधिसभा सदस्य केदारनाथ कवडीवाले, कांचन महाजन, संदीप नेरकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी, प्र.अधिष्ठाता प्रा.जगदीश पाटील, प्रताप तत्वज्ञान केंद्राचे मानद संचालक डॉ. मनीष करंजे, प्रा. जयेंद्र लेकुरवाळे उपस्थित होते.

पुढे बोलताना त्यांनी अहिराणी भाषेतून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना मोठे स्वप्न पाहण्याचा व जीवनात ठाम संकल्प करा. मेहनत आणि सातत्य असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य राहत नाही. स्वतःला सिद्ध करायचे असेल तर कठोर परिश्रम आणि चिकाटी आवश्यक आहे, असे ते म्हणाले. अहिराणी ही केवळ बोली भाषा नसून ती आज गल्लीपासून जागतिक स्तरापर्यंत पोहोचली आहे. असेही त्यांनी सांगितले.

# गांधी विचार परीक्षेत केतन पाटील जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण

प्रतिनिधी । जळगाव



**ए.टी. झांबरे माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवीचा केतन गिरीश पाटील हा विद्यार्थी गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.तर हर्ष शिंपी, श्रीनिधी साधूराव तागड, मानवी अरविंद पाटील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले.**

विद्यालयातील एकूण ८५० विद्यार्थी गांधी विचार परीक्षेला प्रविष्ट झाले होते. विद्यार्थ्यांना मिळालेल्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका पर्यवेक्षक, आणि सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी अभिनंदन केले आहे.

# पंकज बालसंस्कार केंद्रात जागतिक महिलादिन साजरा

प्रतिनिधी । चोपडा

येथील पंकज बालसंस्कार केंद्रात जागतिक महिला दिनानिमित्त ‘उगवतीचे रंग’ या विशेष नृत्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून मातृशक्तीचा गौरव करत आई-पाल्यांमधील प्रेम, जिव्हाळा आणि भावनिक नात्याचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.



कार्यक्रमाची सुरुवात विभागप्रमुख मीना माळी यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी महिलांचे कुटुंब, समाज आणि राष्ट्र घडविण्यातील अनन्यसाधारण योगदान अधोरेखित केले. ‘उगवतीचे रंग’ ही संकल्पना आई-मुलांमधील शब्दापलीकडील नाते नृत्याच्या माध्यमातून व्यक्त करण्यासाठी राबविण्यात आली. हा कार्यक्रम केवळ कला सादरीकरण न राहता भावनांचा सुंदर उत्सव ठरल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या उद्घाटक प्राजक्ता महाले (आयुर्वेदाचार्य, आहार तज्ञ व गर्भसंस्कार तज्ञ) यांनी आपल्या मार्गदर्शनात सात्विक आहाराचे महत्त्व अधोरेखित करत गाईचे तूप, पालेभाज्या, तसेच गणपती स्तोत्र व गायत्री मंत्राचा नियमित जप यामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, असे सांगितले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.सुरेश बोरोले, नवनिर्वाचित अध्यक्ष पंकज बोरोले यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीपाली बोरोले उपस्थित होत्या. मुख्याध्यापक एम.व्ही.पाटील यांनी महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता स्वतःची ओळख निर्माण करत आत्मविश्वासाने व आनंदाने जीवन जगावे, असे आवाहन केले. कार्यक्रमात आदिवासी नृत्य, गणेश वंदना, रिमिक्स साँग तसेच छत्रपती शिवरायांवरील गीतांवर महिला, पालक आणि विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य सादर केले. महिला शिक्षकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

**● सर्व सहभागींचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. समारोप प्रसंगी मुख्याध्यापक एम.व्ही.पाटील यांनी मातृशक्तीला वंदन करत सर्वांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. महिला सन्मान, कुटुंब प्रेम आणि संस्कारक्षम शिक्षण यांचा सुंदर मिलाफ घडवणारा ‘उगवतीचे रंग’ हा कार्यक्रम उपस्थितांसाठी आगळावेगळा आणि अविस्मरणीय ठरला.**

# जळगावच्या नेरीनाका स्मशानभूमीचा कायापालट होणार

## महापौर दीपमाला काळे यांचा कर्मचाऱ्यांना अपडेट राहण्याचा इशारा

प्रतिनिधी । जळगाव

**शहर महानगरपालिकेच्या महापौर दीपमाला काळे यांनी मंगळवार, दि.१० फेब्रुवारी रोजी सकाळी नेरीनाका स्मशानभूमीची अचानक पाहणी केली. महापौरांनी परिसराची स्वच्छता आणि रंगरंगोटीसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण आदेश दिले होते. या कामाची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.**

**रंगरंगोटी आणि सुशोभीकरण**

स्मशानभूमी परिसरात स्वच्छता आणि नीटनेटकेपणा राहावा, यासाठी महापौरांनी संपूर्ण परिसराला पांढरा आणि पिवळा रंग देण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच परिसरातील झाडांना गेरूने रंगकाम करण्याचे आदेशही दिले होते. पाहणीदरम्यान, केवळ बाह्यरूपच नव्हे, तर स्मशानभूमीतील वाढलेल्या झाडांच्या फांद्या छाटून परिसर लवकरात लवकर स्वच्छ करावा, असेही त्यांनी सांगितले.

**सुरक्षारक्षकांची काढली खरडपट्टी**

पाहणीदरम्यान स्मशानभूमीतील वस्तू चोरीला जात असल्याच्या तक्रारी कर्मचाऱ्यांनी महापौरांकडे केल्या.

यावर महापौरांनी संताप व्यक्त करत उपस्थित सुरक्षारक्षकांची चांगलीच खरडपट्टी काढली. यापुढे जर इथून एकही वस्तू चोरीला गेली, तर थेट तुमच्यावरच कायदेशीर कारवाई केली जाईल, असा कडक इशारा त्यांनी दिला. महापौर काळे यांनी यावेळी इतरही महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष वेधले.

**सीसीटीव्ही ताबा:** सध्या स्मशानभूमीतील सीसीटीव्ही फुटेज रोटरी क्लबकडे आहे, ते तातडीने महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

**भंगार हटाव:** परिसरात पडलेले अनावश्यक भंगार त्वरित हटवून जागा मोकळी करण्याचे आदेश दिले.

**विद्युत सुरक्षा :** छतावर आणि परिसरात लोंबकळणाऱ्या उघड्या वीजवाहिन्या (वायरी) चेक करून, अनावश्यक वायरी काढून टाकण्याचे निर्देश त्यांनी दिले.



# अंगणवाडी-आशा कर्मचाऱ्यांना ईपीएफ, पेन्शन लागू करण्याचा निर्णय!

प्रतिनिधी । जळगाव

**राज्यातील अंगणवाडी, आशा कर्मचारी आणि अर्धवेळ परिचारिका यांच्यासाठी मोठा दिलासा देणारा निर्णय समोर आला आहे. दीर्घकाळ सामाजिक सुरक्षा योजनांपासून वंचित राहिलेल्या या कर्मचाऱ्यांना आता भविष्य निर्वाह निधी आणि पेन्शन योजनेचा लाभ मिळणार आहे. प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार सुमारे नऊ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना ईपीएफ आणि पेन्शन योजना लागू करण्यात येणार आहे.**

अमित वशिष्ठ यांनी दिलेल्या या महत्त्वपूर्ण आदेशामुळे अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी, अर्धवेळ परिचारिका तसेच विविध शासकीय योजनांमध्ये मानधनावर काम करणाऱ्या सुमारे ९ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षे कमी मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या भविष्यासाठी आर्थिक सुरक्षिततेचा आधार निर्माण होणार असल्याचे सांगितले जात आहे. १०८४ कोटी १३ लाख रुपये इतके योगदान ६० दिवसांच्या आत जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही रक्कम जमा झाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.